**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४५ व ४६/२०१८-१९/ 21 दिनांक: 28/01/2019

**आदेश**

**आदेश केस क्र. ४५ (२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारदार** - | सौ. सुरेखा ज्ञानदेव मेटे<br>गट क्र. ५५० अ गणेशनगर इचलकरंजी<br>ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग इचलकरंजी "ब" | |

------------X-----------

**आदेश केस क्र. ४६ (२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारदार** - | श्री ज्ञानदेव गणपती मेंटे (केस क्र. ४६(२०१८-१९)<br>गट क्र. ५५० अ गणेशनगर इचलकरंजी<br>ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |

28/1/2019

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय इचलकरंजी

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग इचलकरंजी "ब"

**कोरमः-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.बी. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त आदेश (common Order)

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

उपर निर्दिष्ट दोन्ही ग्राहक तक्रारी एकाच स्वरुपाच्या एकाच कुटुंबातील दोन व्यक्तीनी दोन स्वतंत्र औद्योगिक विज जोडणी करिता दाखल करुन , एकाच स्वरुपाच्या मागण्या केल्याने मुळ व उभय पक्षांद्वारे दोन्ही तक्रारीमध्ये एकाच प्रकारचा युक्तिवाद झाल्यामुळे ,हया एकत्रित आदेशाने , त्या निर्णीत करण्यांत येत आहेत.

### गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

२) केस क्र. ४५(२०१८-१९) मधील तक्रारदार, सौ. सुरेखा ज्ञानदेव मेटे, हयांचे नावे, गट क्र. ५५०/अ गणेशनगर शहापूर , इचलकरंजी येथे ग्राहक क्र. २५०३८०१४१३२५ हया क्रमांकाने ९ अशवशक्ती Power Loom connection under ORC Schme खाली पॅावर लूमसाठी विज जोडणी दिलेली असून, केस क्र. ४६(२०१८-१९) मधील तक्रारदार श्री ज्ञानदेव गणपती मेटे, हयांचे नावे त्याच ठिकाणी ग्राहक क्र. २५०३८०१४३१८२ हया क्रमांकाने ४५ Power Loom connection under ORC/२०/२००६-०७ ची पॅावर लूमसाठी विज जोडणी देण्यात आलेली आहे. सदर विज जोडणी करीता सौ. सुरेखा ज्ञानदेव मेटे हयांनी दिनांक ०९.०१.२००६ रोजी रु. १६,२७५/- तर दिनांक ३०.०८.२००६ रोजी रु. १५,५२५/- अशी एकूण रक्कम रु. ३१,८००/- ORC पोटी वि.प. विज वितरण कंपनीकडे भरलेली आहे, तर केस क्र. ४६(२०१८-१९) मधील तक्रारदार श्री ज्ञानदेव गणपती मेटे हयांनी सदर विज जोडणी करीता ORC पोटी एकूण रक्कम रु. ८३,३५०/- दिनांक ३०.०८.२००६ रोजी पावती क्रमांक [illegible] ने भरलेली आहे. दिनांक २८.०३.२०१८ रोजी उभय तक्रारदारांनी सर्व आवश्यक ती कागदपत्रे जोडून ORC च्यावर नमूद रक्कमा परत मागण्याकरिता स्वतंत्र

अर्ज दिले असता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता ,म.रा.वि.वि.कं.मर्या. उपविभाग इचलकरंजी "ब", हयांनी दिनांक ०४.०६.२०१८ च्या बिलांमध्ये अनुक्रमे रक्कम रु. ४१,९८९/- व रक्कम रु. ९८,६२७/- , विज बिलामध्ये वर्ग केले आहेत. तथापि अतिरिक्त कार्यकारी अभियंता ,म.रा.वि.वि.कं.मर्या. उपविभाग इचलकरंजी "ब", हयांनी ORC रक्कमेवरील व्याजाची आकारणी , फक्त दोन वर्षाकरिता (२४ महिन्याकरीता ) केलेली आहे. ORC/SLC/SCC चार्जेस, पोटी घेतलेल्या रक्कमेवरील व्याज संबंधी वेगवेगळया ग्राहक तक्रार निवारण मंचानी निर्णय दिलेले आहेत. त्या नुसार ORC चार्जेस पोटी घेतलेल्या रक्कमेवरील व्याजाची आकारणीचा फेर हिशोब , प्रत्यक्ष रक्कम भरलेल्या दिनांकापासून ते प्रत्यक्ष देय दिनांका पर्यन्त व्याज दर द.सा.द.शे. १२% प्रमाणे व्हावा, हिशोबाची प्रत मिळावी, सुधारीत हिशोबातून बिलामध्ये वर्ग केलेली रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम त्वरीत मिळावी किंवा विज बिलामध्ये वर्ग करावी , अशा मागण्या उभय तक्रारदारांनी हया कामी केलेल्या आहेत.

३) प्रस्तुत तक्रारी, हया मंचा समोर दाखल करण्या अगोदर , उभय तक्रारदारांनी , अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, कोल्हापूर हयांचेकडे तक्रार क्र. ८१९९ आणि तक्रार क्र. ८१९८ (अनुक्रमे) अशा दाखल केलेल्या होत्या. सुनावणी दरम्यान अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे निर्दशनास गैर अर्जदारांतर्फे दोन्ही तक्रारदार/ग्राहकांना ORC ची रक्कम परत करण्यांत आलेली असून, ती परत करतेवळी मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. CE/(Distt)/D-iv/MERC/०५०३९ दिनांक ०७.०३.२०१७ नुसार ६% व्याज देखील देण्यात आल्याचे आणून दिल्यानंतर, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने आपले दिनांक १.०९.२०१८ चे स्वतंत्र आदेशाने दोन्हीही तक्रारी खारीज केलेल्या आहेत. त्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे मागणी करत दोन्हीही तक्रारदारांनी ,हया तक्रारी दाखल केलेल्या आहेत.

४) उभय प्रकरणांची नोटीस मिळाल्यानंतर वि.प. विज वितरण कंपनीने अतिरिक्त कार्यकारी अभियंता , म. रा. वि.वि.कं.मर्या. "ब" उपविभाग इचलकरंजी , हयांचे मार्फत हजर होऊन , दोन्ही प्रकरणांत , एकाच स्वरुपाचे ,परंतु स्वतंत्र म्हणणे मांडलेले आहे. त्यांचे कथनानुसार उभय तक्रारदारांना ORC च्या रक्कमांचा परतावा देताना CE/(Distt)/D-iv/MERC/०५०३९ दिनांक ०७.०३.२०७, हया पुरवणी परीपत्रकानुसार बॅकेतील व्याज दर द.सा.द.शे. ६% प्रमाणे दिनांक २०.०१.२००५ ते ३०.०४.२००७ हया काळातील व्याज देण्यांत आलेले आहे.

५) प्रस्तुत प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १८.०१.२०१८ रोजी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान उभय तक्रारदारातर्फे, त्यांचे प्रतिनिधी श्री मुकुंद माळी तर वि.प. विज वितरण कंपनी तर्फे श्री एस.एल. कोळी, कार्यकारी अभियंता, इचलकरंजी विभाग हजर होते त्यांचे युक्तीवाद ऐकून घेण्यात आले.

६) उभय प्रकरणी आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. .

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | उभय तक्रारदाराच्या मागण्या मंजूर होण्यास पात्र आहेत काय? | नाही |
| २ | अंतिम आदेश? | खालील प्रमाणे |

28/1/2019

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ :-** उभय प्रकरणातील सर्व तथ्ये(Fact) उभय पक्षाना मान्य आहेत. विस्तार भयापोटी त्यांचा पुर्नउच्चार करणे आम्ही टाळलेले आहे. तक्रारदाराना ORC योजने खाली पॉवरलूम करिता तक्रार अर्जात नमूद केलेप्रमाणे विद्युत कनेक्शन देण्यात आले आहे व त्या करिता तक्रारदारानी त्यांच्या त्या तक्रार अर्जात नमूद केलेल्या रक्कमा त्या त्या तारखेला जमा केलेल्या आहेत.ही बाब वि.प. विज वितरण कंपनीने मान्य केलेली आहे. तसेच तक्रारदाराच्या मागणी नुसार सदर ORC रक्कम तक्रारदाराना परत देखील करण्यात आलेल्या आहेत. ही बाब उभय पक्षी मान्य आहे. सदर रक्कमेचा परतावा देतेवेळी त्या रक्कमावर दिनांक २०.०१.२००५ ते ३०.०४.२००७ च्या कालाकरिता द.सा.द.शे.६ % दराने व्याज देखील अदा करण्यात आलेले आहे, आणि सदरची बाब उभय तक्रारदारानी मान्य केलेली आहे. दिनांक २०.०१.२००५ ते ३०.०४.२००७ या कालावधी करिता ORC च्या रक्कमेवर द.सा.द.शे. ६% दराने व्याज केस क्र. ८२/२००६ मधील म.रा. विज नियमाक आयोगाच्या दिनांक १७.०५.२००७ व दिनांक २१.०८.२००७ च्या आदेशानुसार काढण्यात आलेल्या पूर्व CE/Dist/D-IV/MERC/०५०३९ दिनांक ०७.०३.२०१८ चे परिपत्रकानुसार तक्रारदारास व्याज देण्यात आले आहे. असे प्रतिपादन वि.प. तर्फे करण्यात आलेले आहे. त्या परिपत्रकानुसार तक्रारदारास देण्यात आलेले व्याज आणि त्यांचा कालावधी बरोबर असल्याचे दिसते.

तक्रारदारातर्फे अकोला येथील ग्राहक तक्रार निवारण मंच यांचा केस क्र. २०/२०१८ मधील दिनांक ०५.०७.२०१८ चा आदेश तसेच महाराष्ट्र राज्य विज नियमाक आयोग केस क्र. २३/२००४ मधील दिनांक १८.१०.२००५ च्या आदेशाचा आधार घेण्यात आलेला आहे. अकोला येथील मंचाने त्या प्रकरणात SSC चार्जेस चा परतावा तक्रारदाराना मंजूर करताना त्यावर सदर रक्कम वसूलीच्या दिनांकापासून सदर रक्कमेच्या पुढील विज बिलातून परतावा देण्याच्या तारखेपर्यन्त द.सा.द.शे. १२% दराने व्याज देण्याचा आदेश पारित केलेला आहे तर मा. राज्य आयोगाने सदर प्रमाणेच SLC व SCC हया रक्कमांवर द.सा.द.शे १२% दराने व्याज देण्याचा आदेश पारित केला आहे या दोन्ही आदेशाचे अवलोकन करता हे स्पष्टपणे आढळून येते की, सदरचा व्याज दर त्या प्रकरणातील विशिष्ट परिस्थितीचा विचार करुन मंच व आयोगाने आपल्या स्वे:इच्छे अधिकार (Distribution powers) नुसार सदर व्याजाची आकारणी केलेली आहे. सबब तो व्याज दर न्यायदंडक होऊ शकत नाही. त्या प्रकरणातील विशिष्ट परिस्थितीनुसार तो व्याज दर लावण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात वर नमूद केलेल्या परिपत्रकात व्याज दरासंबंधी स्पष्ट अशा सूचना आहेत आणि त्या प्रमाणे उभय तक्रारदाराना व्याज देण्यात देखील आलेले आहे. त्या दरापेक्षा जास्ती दराने व्याज देण्या सारखी कोणतीही विशिष्ट परिस्थिती या प्रकरणांत दिसत नाही. तक्रार अर्जात मागणी केलेल्या दराने व्याज मिळण्याचा कोणताही कादेयशीर अधिकार तक्रारदाराना नाही. सबब तक्रारदाराच्या मागण्या मंजूर करता येत नाही, असा या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. सबब आम्ही मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

वरील निष्कर्षानुसार प्रस्तुतच्या उभय तक्रार अर्ज ना मंजूर करावे लागतील असा या मंचाचा निष्कर्ष आहे . सबब आम्ही खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहोत.

28/1/2019

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## आदेश

१) तक्रार अर्ज ४५(२०१८-१९) व तक्रार अर्ज ४६(२०१८-१९) ना मंजूर करण्यात येत आहेत.
२) आदेशाच्या मुळ प्रत तक्रार क्रमांक ४५(२०१८-१९) मध्ये ठेऊन त्यांची सांक्षाकीत प्रत तक्रार क्रमांक. ४६(२०१८-१९) मध्ये ठेवावी.
३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (एन.बी. बारसिंग) | (ए.व्ही. देशपांडे) 28/1/2019 |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण